जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ (बांधकाम) संवर्गातील कनिष्ठ अभियंता यांची दि.१/१/२०१५ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूचीतील आक्षेपाबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः झेडएनजी-२०१७/ प्र.क्र.२५ /आस्था-४
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
तारीख: ०३ ऑक्टोबर, २०१७

वाचा:- शासन परिपत्रक क्रमांकः झेडएनजी-२०१७/प्र.क्र.२५/आस्था-४, दि. ३०.०५.२०१७.

शुध्दीपत्रक

जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (बांधकाम) संवर्गातील कनिष्ठ अभियंत्यांची दि. १ जानेवारी, २०१५ रोजीची अंतिम जेष्ठता सूची या विभागाच्या संदर्भाधिन दि. ३०.०५.२०१७ च्या अन्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२) प्रस्तुत ज्येष्ठता यादीतील भाग-१ मध्ये कनिष्ठ अभियंत्यांच्या यादीत श्री. व्ही.जी.चिटगोपकर यांचे नाव अ.क्र. १७० वर नमूद करुन नियमित नियुक्ती दि. २६.०३.२००१ दर्शविण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी सादर केलेल्या अहवालानुसार श्री.व्ही.जी.चिटगोपकर यांना ३/८ सेवेचा लाभ देवून सहायक अभियंता म्हणून त्यांची सेवा दि.२८/०६/१९९५ पासून नियमित केली असल्यामुळे सदर दिनांकानुसार श्री.चिटगोपकर यांच्या नावाचा समावेश उपरोक्त जेष्ठता सूचीच्या भाग-१ मधील **क्रमांक १७० ऐवजी क्रमांक ५२** येथे करण्यात येत आहे.

३) संदर्भाधीन ज्येष्ठता सूचीत क्रमांक १४१ वर श्री. एन.बी.चौधरी, कनिष्ठ अभियंता यांचा नियमित नियुक्ती दिनांक ०८.०३.१९९९ असा दर्शविण्यात आला आहे. तथापि याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून श्री. एन.बी.चौधरी, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, नाशिक यांचेबाबत शासनास प्राप्त झालेल्या अहवालानुसार प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळाचे श्री.एन.बी.चौधरी यांचे शिफारसपत्र व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचे दिनांक ०८.०१.१९९७ रोजीचे आदेश, सेवा पुस्तकातील वेतन श्रेणीची नोंद व विभागीय आयुक्त नाशिक यांचे श्री. चौधरी यांना सहायक अभियंता श्रेणी-२ म्हणून दर्जा दिलेले आदेश पाहता श्री. एन.बी.चौधरी यांचा दि. ०९.०१.१९९७ असा नियमित नियुक्ती दिनांक निश्चित करण्यात येवून त्यांच्या नावाचा समावेश सदर जेष्ठता सूचीच्या भाग-१ मधील **क्रमांक १४१ ऐवजी क्रमांक ९७** येथे करण्यात येत आहे.

४) संदर्भाधीन १ जानेवारी, २०१५ रोजीच्या जेष्ठता सूचीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार यांच्या प्रस्तावात श्री. एस.आर. राठोड यांचे नाव नसल्याने त्यांच्या नावाचा समावेश ज्येष्ठता सूचीत करण्यात आला नाही. तथापि दिनांक ०१.०१.२०१४ रोजीच्या ज्येष्ठता सूचीत सदर नावाचा समावेश दिसून येतो. या प्रकरणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार यांच्या

प्राप्त अभिप्रायानुसार श्री. एस.आर. राठोड यांची सेवा ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय दि. २९.०४.१९९९ अन्वये नियमित केली आहे. यास्तव श्री. राठोड यांचा ज्येष्ठतेचा दि. १२.०४.१९९० ऐवजी दि. ०८.०३.१९९९ असा निश्चित करण्यात येत असून श्री. एस.आर. राठोड यांच्या नावाचा समावेश उपरोक्त जेष्ठता सूचीच्या भाग-१ मधील क्रमांक १३० वर घेण्यात येत आहे.

५) उप आयुक्त (आस्थापना), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी श्री. डी.व्ही.बस्वदे, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, नांदेड यांचे नाव सदर ज्येष्ठता सूचीतील भाग-२ मध्ये समाविष्ट करण्याबाबत शासनास अवगत केले आहे. श्री. बस्वदे यांचे नाव ज्येष्ठता यादीमध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. यास्तव श्री. बस्वदे यांचा ज्येष्ठतेचा दि. १८.०४.२०११ असा निश्चित करण्यात येत असून श्री. डी.व्ही.बस्वदे यांच्या नावाचा समावेश उपरोक्त जेष्ठता सूचीच्या भाग-२ मधील क्रमांक १४३४ वर घेण्यात येत आहे.

६) सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सदर शुद्धीपत्रक त्यांच्या जिल्हा परिषदेतील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

७) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००३१६१३५५७४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Ramesh Shinde

Digitally signed by Vivek Ramesh Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=98222e73b61528cee875e0cab75e02437703c365921479fb0198fcf43d79d224, serialNumber=3d2f2d59501068679dd214122d63cb4d2d18b76f5a89cae6eca0162ae6701444, cn=Vivek Ramesh Shinde
Date: 2017.10.03 17:01:22 +05'30'

(वि. र. शिंदे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त, सर्व विभाग
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
३. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. निवडनस्ती

जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ (बांधकाम) संवर्गातील कनिष्ठ अभियंता यांची दि.१/१/२०१५ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची.

भाग-१

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नाव		जिल्हा परिषद	जन्म दिनांक	शैक्षणिक अर्हता	पदावरील नियमित नियुक्तीचा दिनांक	जात प्रवर्ग	व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण/सुट	शेरा
५२	श्री.	व्ही.जी.चिटगोपकर	उस्मानाबाद	०१.०७.१९६७	एएमआयई	२८.०६.१९९५	खुला	उत्तीर्ण	--
९७	श्री.	एन.बी.चौधरी	नाशिक	२६.०५.१९६८	बी.ई.	०९.०१.१९९७	इ.मा.व.	उत्तीर्ण	
१३०	श्री.	एस.आर.राठोड	नंदूरबार	०१.०६.१९६२	बी.ई.	०८.०३.१९९९	वि.जा.अ.	उत्तीर्ण	

जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ (बांधकाम) संवर्गातील कनिष्ठ अभियंता यांची दि.१/१/२०१५ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची

भाग-२

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नाव		जिल्हा परिषद	जन्म दिनांक	शैक्षणिक अर्हता	पदावरील नियमित नियुक्तीचा दिनांक	जात प्रवर्ग	व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण/सुट	शेरा
१४३४	श्री.	डी.व्ही.बस्वदे	नांदेड	१०.०६.१९७०	डी.सी.ई	१८.०४.२०११	खुला	उत्तीर्ण	अपंग

****